मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड शहरात पाच हजार ४५९ ठिकाणी आढळल्या डासांच्या अळ्या!

## साडे आठ लाखांचा दंड वसूल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी ।** डेंग्यू, मलेरिया यांसारख्या रोगांना आळा बसावा व त्यांच्या प्रसारास प्रतिबंध व्हावा यासाठी डासांची उत्पत्ती शोधण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील दोन लाख ६९ हजार ७५४ घरांची तपासणी केली. पाच हजार ४५९ कंटेनरमध्ये डासांच्या अळ्या आढळून आल्या आहेत. साडेआठ लाखांचा दंड वसूल केला आहे. आरोग्य विभागाने १ जून ते ३१ ऑगस्ट या कालावधीत तपासणी मोहीम राबविली. ९९२ टायर आणि भंगार दुकाने, १ हजार १५४ बांधकामांची तपासणी करून तीन हजार ५३० कंटेनर रिकामे केले. यामधील एक हजार २११ जणांना नोटीस दिल्या. डास आढळलेल्या घरगुती आणि व्यावसायिक मालमत्तांकडून आठ लाख ८२ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. घरगुती अस्थापनांना एक हजार, व्यावसायिक अस्थापनांना दोन हजार तर मॉल, रुग्णालये, बांधकाम सुरू असलेल्या इमारत यांना दहा हजारांचा दंड आकारण्यात येतो.वाढत्या शहरीकरणामुळे शहर परिसरात हवा-पाण्याचे



प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे साथीच्या रोगांनी शहरात थैमान घातले असून, गेल्या काही दिवसांत डासांमुळे पसरणाऱ्या डेंग्यू आणि चिकुनगुनियाच्या रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. सोसायट्यांबरोबरच घरातही फुलदाणी, फ्रिजच्या मागील ट्रे, कुंड्या यातून, तसेच रुग्णालये, बांधकामे, सरकारी कार्यालये अशा वेगवेगळ्या ठिकाणी डेंग्यूचे डास आढळले आहेत. या सर्वांना नोटीस बजाविण्यात येत असल्याचे आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांनी सांगितले. नागरिकांनी पाणी साठवून ठेऊ नये, पाणी साठविल्यास ते झाकून ठेवावे. आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, स्वच्छ पाण्यातच डेंग्यूचे डास अळ्यांची पैदास करतात. त्यामुळे पाणी साचणार नाही, याबाबत नागरिकांनी खबरदारी घ्यावी', असे पिंपरी चिंचवड आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

### रुग्णांचे प्रमाण वाढत!

**» वाढत्या शहरीकरणामुळे शहर परिसरात हवा-पाण्याचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे साथीच्या रोगांनी शहरात थैमान घातले असून, गेल्या काही दिवसांत डासांमुळे पसरणाऱ्या डेंग्यू आणि चिकुनगुनियाच्या रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. सोसायट्यांबरोबरच घरातही फुलदाणी, फ्रिजच्या मागील ट्रे, कुंड्या यातून, तसेच रुग्णालये, बांधकामे, सरकारी कार्यालये अशा वेगवेगळ्या ठिकाणी डेंग्यूचे डास आढळले आहेत. या सर्वांना नोटीस बजाविण्यात येत असल्याचे आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांनी सांगितले.**

# भक्तीशक्ती चौक ते दापोडी रस्त्यांवरील सर्व खड्डे बुजवा!

## रस्त्याचे डांबरीकरण करा; मनसेचे महापालिका आयुक्तांना निवेदन

**पिंपरी। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** गणेशोत्सवापूर्वी निगडी ते दापोडी रस्त्यांवरील खड्डे बुजवा, रस्त्याचे डांबरीकरण करा, अशी मागणी महाराष्ट्र नव निर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना यासंदर्भात निवेदन दिले आहे. सचिन चिखले यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निगडीतील भक्तीशक्ती चौक ते दापोडी हा रस्ता अर्बन स्ट्रीट अंतर्गत



विकसित करण्यात यावा. तसेच भक्तीशक्ती चौक ते दापोडी या रस्त्याचे संपूर्ण डांबरीकरण करण्यात यावे. निगडी ते दापोडी हा शहरातील मुख्य रस्ता असून कामगार वर्ग, विद्यार्थी वर्ग, त्याचप्रमाणे महिला वर्ग हा रस्ता वापरत असून आता सध्या ह्या रस्त्याची अवस्था खूप खराब झालेली आहे. सदर रस्ता मुख्य दळणवळणाचा भाग असून हा रस्ता विकसित करून सुशोभीकरण करण्यात यावा. तसेच या रस्त्यावर योग्य त्या अंतरावर ठिकठिकाणी महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृहे उभारण्यात यावी. या मार्गावर ठीकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे झालेले असून त्यातून गंभीर अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. त्यामुळे लवकरात लवकर हा मार्ग संपूर्णपणे डांबरीकरण करावा अशी मागणी सचिन चिखले यांनी केली आहे.

### रस्त्याची खराब अवस्था ...

**» निगडी ते दापोडी हा शहरातील मुख्य रस्ता असून कामगार वर्ग, विद्यार्थी वर्ग, त्याचप्रमाणे महिला वर्ग हा रस्ता वापरत असून आता सध्या ह्या रस्त्याची अवस्था खूप खराब झालेली आहे. सदर रस्ता मुख्य दळणवळणाचा भाग असून हा रस्ता विकसित करून सुशोभीकरण करण्यात यावा. तसेच या रस्त्यावर योग्य त्या अंतरावर ठिकठिकाणी महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृहे उभारण्यात यावी.**

# पवना धरण १०० टक्के भरले!

## १४०० क्यूसेक्सने पाण्याचा विसर्ग सुरू



**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पवना नदी काठच्या सर्व नागरिकांनी सतर्क रहावे. नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदीमधील पाण्याचे पंप, नदी काठची शेतीची अवजारे, जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत, असे आवाहन पवना धरण पूरनियंत्रण कक्षाने केले आहे. मागील पंधरा दिवस दडी मारलेल्या पावसाने शुक्रवारी रात्रीपासून जोरात हजेरी लावली आहे. मावळसह पिंपरी-चिंचवड शहर परिसरात जोरदार पाऊस पडला आहे. पवना धरण १०० टक्के भरले असून धरणातून १४०० क्यूसेक्सने विसर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पवना धरण १०० टक्के क्षमतेने भरले आहे. वीज निर्मिती ग्रहाद्वारे पवना नदीमध्ये पिण्यासाठी व सिंचनासाठी सकाळी साडे नऊ वाजता ८०० क्यूसेक्स विसर्ग करण्यात आलेला आहे. हा विसर्ग बारा वाजता १४०० क्यूसेक्स करण्यात येणार आहे. तसेच धरण क्षेत्रात पावसाचे प्रमाण पाहता कधीही पवना धरणाच्या सांडव्यावरून पवना नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सुरू करण्याची शक्यता आहे. पवना नदी काठच्या सर्व नागरिकांनी सतर्क रहावे. नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदीमधील पाण्याचे पंप, नदी काठची शेतीची अवजारे, जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत, असे आवाहन पवना धरण पूरनियंत्रण कक्षाने केले आहे.

# पिंपरी- चिंचवडमध्ये जोरदार पाऊस!

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे आणि परिसरात रात्री बारा वाजल्यापासून संततधार पाऊस सुरू आहे. सर्वाधिक ८३.५ मिलिमीटर पावसाची नोंद पिंपरी चिंचवडमध्ये झाली आहे. मगरपट्टा सिटीत ५४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली. मोसमी पावसाच्या यंदाच्या हंगामात म्हणजे जूनपासून ऑगस्टअखेर पुण्याला संततधार पावसाने हुलकावणी दिली होती. हंगामात पहिल्यांदाच अशा प्रकारचा संततधार पाऊस पुण्यात होत आहे. त्यामुळे पुणेकर सुखावले आहेत. रात्री साधारण बारानंतर सुरू झालेला संततधार पाऊस सकाळी दहा वाजेपर्यंत सुरूच होता. या काळात सर्वाधिक पाऊस पावसाची नोंद पिंपरी चिंचवड परिसरात झाली असून, ८३.५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्या खालोखाल मगरपट्टा सिटीत ५४ मिलिमीटर पावसाचे नोंद झाली आहे. लोहगावात ३१.८, शिवाजीनगरमध्ये १९.६ आणि पाषाणमध्ये १२.८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

# फडणवीस यांनी राजीनामा द्यावा!

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या आंदोलकांवर पोलीसांनी केलेल्या लाठीमाराचा आम आदमी पार्टीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या प्रकरणातील दोषी पोलिसांवर कारवाई करावी, तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी आम आदमी पक्षाच्या वतीने करण्यात आली. जालना जिल्ह्यातील अंतवरली सराटी गावामध्ये मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक उपोषण करत होते. मात्र आंदोलकांना उपोषणासाठी विरोध करत पोलिसांनी आक्रमक होत आंदोलकांवर तीव्र लाठीचार केला. त्यानंतर पोलिसांनी हवेत गोळीबार केला. मराठा उपोषण आंदोलन चिरडण्यासाठी पोलिसांनी केलेल्या कारवाई विरोधात राज्यभरात आम आदमी पार्टीकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

सराटी गावामध्ये मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरु होतं असताना आंदोलकांच्या मंडपात पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यामुळे महिला, लहान मुले मोठ्या संख्येने जखमी झाले आहेत. जालन्यातील आंदोलन अमानुष पद्धतीनं मोडून काढण्याच्या राज्य सरकारच्या कृतीचा आम आदमी पार्टी तीव्र निषेध करत मराठा आरक्षण प्रकरणी सरकारनं समाजाचा अंत पाहू नये असा इशारा आप दिला आहे. पोलिसांनी महिला, वयोवृध्द नागरिक, लहान मुलांना व उपचार करणाऱ्या डॉक्टरला सुद्धा मारहाण केली. मोठ्या प्रमाणात छऱ्यांचा वापर करण्यात आला. आम आदमी पार्टीने या घटनेचा जाहीर निषेध करत पुढील मागण्या केल्या आहेत.

# राज्य सरकारचा सकल मराठा दिघी ग्रामस्थांच्या वतीने निषेध!

## छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या घोषणा

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**



मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात आंतरवाली सराटी येथे मराठा समाजाचे प्रतिनिधी उपोषण करत होते. या ठिकाणी शुक्रवारी सायंकाळी पोलिसांनी लाठीमार करीत हवेत गोळीबार केला.

या घटनेचा पिंपरी चिंचवड शहरात सर्व प्रथम दिघी येथील सकल मराठा समाजाच्या वतीने राज्य सरकारच्या विरोधात घोषणा देत तीव्र निषेध व्यक्त केला. मराठा समाजाचे शांततापूर्ण सुरू असलेले हे उपोषण पोलीसांनी अमानुष पद्धतीने दडपण्याचा प्रयत्न केला आहे. याचा निषेध करण्यासाठी दिघी मधील सकल मराठा समाजाच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी राजे चौकात शनिवारी सकाळी भर पावसातात 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'; 'एक मराठा लाख मराठा'; 'या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय'; मराठ्यांना आरक्षण मिळालेच पाहिजे' अशा घोषणा देत राज्य सरकारचा निषेध करण्यात आला.

यावेळी संतोष तानाजी वाळके, कृष्णाभाऊ वाळके, सागर रहाणे, निलेश जोगदंड, बापू परांडे, केशव वाघमारे, गुलाबराव पाटील, अरविंद गोरे, धीरज खांडवे, श्रीमंत गजधने, कैलास तापकीर, संतोष जाधव, कैलास बोरसे, शाम परदेशी, के. के. जगताप, सुनील काकडे, प्रशांत काकेल, किशोर ववले, प्रवीण भोसले, बबन पारधी, हरिभाऊ लबडे, नंदकुमार तळेकर, आबा सुंडके, संदीप सांगुळे, आप्पासाहेब खोत, दत्ता घुले आदी उपस्थित होते.

# जालना मराठा आंदोलन लाठीमार!

## पुण्यात सकल मराठा समाजाचे आंदोलन

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

मराठा क्रांती मोर्चा, पुणे तर्फे जालना येथे शांततेत चाललेले मराठा आंदोलन अमानुष लाठीमार करत चिरडण्याचा जो प्रकार झाला त्याचा निषेध म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे तीव्र निदर्शने शनिवारी करण्यात आले.यावेळी सर्व मराठा संघटनांच्या प्रतिनीधींसह सर्व पक्षीय कार्यकर्ते हजर होते. या आंदोलनातराजेंद्र कोंढरे, तुषार काकडे, निलेश वरे, राजेंद्र कुंजीर, सचिन आडेकर, ज्योती कोंडे, पूजा झोळे, अमर पवार, किशोर मोरे, युवराज दिसले, गुलाबराव गायकवाड, अनिल मारणे आदिंसह राष्ट्रवादी पक्षाचे रवींद्र माळवदकर, रोहन पायगुडे, गणेश नलावडे, वेणू शिंदे, शिवसेनेचे राजेंद्र शिंदे यांच्या सह असंख्य जण उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर सरकार विरुद्ध घोषणांनी दुमदुमून गेला. उपस्थितांनी प्रखर शब्दात सरकारचा निषेध केला व यापुढील आंदोलन प्रखर करण्याचा निर्धार व्यक्त केला. संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते संतोष शिंदे म्हणाले,मराठा आरक्षण आंदोलकावर हल्ला करणाऱ्या अफजलखांनी सरकारचा जाहीर निषेध आम्ही व्यक्त करतो. मराठ्यांच्या जीवावर जगता आणि मराठ्यांवरच लाठी चार्ज करता याचा अर्थ हे सरकार आरक्षण विरोधी आहे.आरएसएसच्या लोकांना आरक्षण नको आहे म्हणूनच जाणीवपूर्वक हा आरक्षणाचा खेळ खंडोबा सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे , देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा निषेध करावा तेवढा कमी आहे.तुमच्याकडून आणि तुमच्या सरकारकडून आणि आपल्या सरकारकडून ही अपेक्षा नव्हती. मराठा पावसाने उध्वस्त झाला ,मराठा दुष्काळाने उध्वस्त झाला आणि मराठा आरक्षण मिळालं नाही म्हणून उद्धस्त झाला. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी आमची मागणी आहे.



# शैक्षणिक शुल्कांचे होणार ऑडिट!

## अर्थव्यवस्थेला गती देणार : चंद्रकांत पाटील

**पुणे ।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

सनदी लेखापाल हा बुद्धीने काम करणारा वर्ग आहे. अर्थव्यवस्थेला गती देण्याचे व सक्षम करण्याचे दायित्व त्यांच्यावर आहे. सनदी लेखापालांच्या मार्गदर्शनाने आपल्या देशाच्या शताब्दी महोत्सवी वर्षात २०४७ पर्यंत जगातील पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचे ध्येय गाठता येईल, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तथा पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. जगाचा वेध घेऊन इनोव्हेशन, पेटंट आणि रॉयल्टी या गोष्टींवर आपण भर द्यायला हवा, असेही ते यावेळी म्हणाले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) डायरेक्ट टॅक्स कमिटी (डीटीसी) व आयसीएआय पुणे शाखेच्या वतीने 'प्रत्यक्ष कर' विषयावर आयोजित २ दिवसीय राष्ट्रीय परिषदेत चंद्रकांत पाटील बोलत होते.




जवळपास ४५० सीए सभासद या परिषदेत सहभागी झाले आहेत. या प्रसंगी 'डीटीसी'चे व्हाईस चेअरमन सीए पियुष छाजेड, केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, सीए पुरुषोत्तम खंडेलवाल, सीए प्रीती सावळा, विभागीय समिती सदस्य सीए ऋता चितळे, सीए यशवंत कासार, आयसीएआय पुणेचे चेअरमन सीए राजेश अग्रवाल, व्हाईस चेअरमन सीए अमृता कुलकर्णी, सचिव सीए अजिंक्य रणदिवे, सीए प्रणव आपटे, सीए मौशमी शहा, सीए सचिन मिणियार, सीए काशिनाथ पठारे आदी उपस्थित होते. चंद्रकांत पाटील म्हणाले, वाणिज्य क्षेत्रातील व्यवसाय, उद्योगांसाठी अशा परिषदेचे आयोजन महत्वाचे आहे. कारण सरकारने अनेक नव्या गोष्टी आणल्या, तरी त्याची अंमलबजावणी सीए करतात. संशोधन, इनोव्हेशन वाढल्याने आपणही उत्पादक बनत आहोत. इंधनात इथेनॉलचा वापर होऊ लागल्याने क्रूड ऑईलची २ लाख कोटींची आयात कमी झाली.

त्यामुळेच आपल्याला रशियामधील अस्थिरतेचा फटका बसला नाही. प्रत्येक आर्थिक व्यवहारात सीएची गरज लागते. तुम्ही आर्थिक शिस्त लावण्याचे काम करत आहात. राज्यातील अनेक शाळा व संस्थांच्या शैक्षणिक शुल्काचे ऑडिट होत नाही. त्यामुळे आर्थिक स्थिती समजत नाही. यापुढे सनदी लेखापालांचे पॅनल नेमून शैक्षणिक शुल्काचे ऑडिट केले जाणार आहे. त्यासाठी राज्यात ७०० ते ८०० सीएची मदत घेतली जाणार आहे, असेही चंद्रकांत पाटील यावेळी म्हणाले. सीए चंद्रशेखर चितळे यावेळी म्हणाले, देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी सर्व सीए योगदान देत आहेत. करसंरचनेतील बदल, तरतुदी समजाव्यात, त्यात सुसूत्रता आणण्यासाठी सनदी लेखापालांनी काही बदल सुचवावेत, यासाठी प्रत्यक्ष कर विषयावरील ही परिषद महत्वाची आहे.

# पावसाचे जोरदार पुनरागमन!

## पुण्यासह पिंपरी चिंचवड व ग्रामीण भागात दमदार पाऊस

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पुण्यात पावसाने पुन्हा एकदा जोर धरला आहे. पुण्यासह पिंपरी चिंचवड व जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शुक्रवार रात्रीपासून दमदार पाऊस सुरू आहे. यामुळे पिके करपण्याच्या चिंतेने व्याकूळ झालेल्या बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे. गत महिन्याभरापासून पावसाने मोठा ब्रेक घेतला. यामुळे सर्वसामान्यांसह शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर शुक्रवारी रात्री पुण्याच्या बिबवेवाडी, कोथरूड, पेठ परिसर, एनआयबीएम, शिवाजीनगर, हडपसर आदी भागात मुसळधार पाऊस झाला. याशिवाय पुणे ग्रामीणमधील पिंपरी चिंचवडमधील मोशी व मावळ तालुक्यातही जोरधारा कोसळल्या. शनिवारी सकाळी ९.०५ वाजेपर्यंत शिवारीजनगरात १९ मिमी पावसाची नोंद झाली. तर चिंचवडमध्ये ८३.५ मिलिमीटर, मगरपट्ट्यात ५४ एमएम, लोहेगावात ३१.८ मिमी व पाषाणमध्ये १२.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पुण्याच्या लोणावळ्यातही पावसाने पुन्हा एकदा चांगलाच जोर धरला आहे. शुक्रवारी मध्यरात्री इथे पावसाने चांगली कृपादृष्टी दाखवली. या ठिकाणी सुमारे १०० मिलिमीटर पाऊस झाला. या भागातील प्रत्येकाला गत ३ आठवड्यांपासून पावसाची प्रतिक्षा होती. आता ताज्या पावसामुळे पुन्हा एकदा पर्यटकांचे पाय येथील वर्षाविहाराचा आनंद घेण्यासाठी वळतील व त्यामुळे येथील व्यवसाय रुळावर येतील असा अंदाज आहे. गतवर्षीच्या तुलनेत येथे तब्बल ७७७ मिलिमीटर पाऊस कमी झाला आहे. गतवर्षी आजच्या दिवशी या भागात ४५८३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. पण यंदा मात्र येथे केवळ ३८०६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. दुसरीकडे, हवामान खात्याने सप्टेंबर महिन्यात समाधानकारक पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. यामुळे अरबी समुद्रातील मान्सूनची शाखा कोकणात सक्रिय होऊन या भागात पाऊस होण्याचा अंदाज आहे. याशिवाय विदर्भातही काही ठिकाणी पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. मराठवाडा व मध्य महाराष्ट्रातही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हा पाऊस किती असेल व किती कालावधीसाठी असेल हे बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र कोणत्या दिशेने प्रवास करते यावर अवलंबून असेल. त्यामुळे ऑगस्ट महिन्यातील पावसाचा तुटवडा सप्टेंबर महिन्यात भरून निघेल का? याविषयी साशंकता आहे.



### लोणावळ्यातही जोरधारा

» पुण्याच्या लोणावळ्यातही पावसाने पुन्हा एकदा चांगलाच जोर धरला आहे. शुक्रवारी मध्यरात्री इथे पावसाने चांगली कृपादृष्टी दाखवली. या ठिकाणी सुमारे १०० मिलिमीटर पाऊस झाला. या भागातील प्रत्येकाला गत ३ आठवड्यांपासून पावसाची प्रतिक्षा होती. आता ताज्या पावसामुळे पुन्हा एकदा पर्यटकांचे पाय येथील वर्षाविहाराचा आनंद घेण्यासाठी वळतील व त्यामुळे येथील व्यवसाय रुळावर येतील असा अंदाज आहे. गतवर्षीच्या तुलनेत येथे तब्बल ७७७ मिलिमीटर पाऊस कमी झाला आहे. गतवर्षी आजच्या दिवशी या भागात ४५८३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती.

# महावितरणच्या अभियंताला लाच घेताना रंगेहात पकडले!

## ठेकेदाराकडून मागितले ५० हजार रुपये

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पूर्ण झालेल्या कामाचे दाखल देण्यासाठी ठेकेदाराकडून ५० हजारांची लाच मागणाऱ्या महावितरणच्या सहाय्यक अभियंताला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले.रवींद्र नानासाहेब कानडे (वय-३७) असे लाचखोर अधिकाऱ्याचे नाव आहे. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. तक्रारदार हे सरकारी विद्युत ठेकेदार आहेत. त्यांना आर. एम. सी. प्लांटसाठी लागणाऱ्या विद्युत पुरवठाचा ठेका मिळाला होता. हे काम शासकीय योजनेच्या १. ३ टक्के तत्वाच्या नियमानुसार पूर्ण केले होते. या कामाच्या पूर्णत्वाचा दाखल देण्यासाठी कानडे यांनी ५० हजारांची मागणी केली होती. तक्रारदाराने याबाबत तक्रार दिल्यानंतर बाणेर येथील महावितरणच्या उपकेंद्र कार्यालयात सापळा लावून सहाय्यक अभियंता कानडे यांना ५० हजारांची लाच घेतांना रंगेहात पकडण्यात आले. कानडे यांच्यावर चतुर्श्रुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली.शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी लाच मागितल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शिवाजीनगर दिवाणी न्यायालयातील बेलिफला एक हजार रुपयांची लाच घेताना लाचुलपत विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. येथील गेट क्रमांक चारच्या समोरील एका चहाच्या दुकानासमोर ही कारवाई करण्यात आली आहे. लक्ष्मण नथू काळे (वय.४०) असे लाचखोर बेलिफ (कर्मचार्याचे) नाव आहे. याप्रकरणी, २९ वर्षीय महिलेने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार काळे आणि अन्य एका व्यक्तीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार यांनी जमीनीच्या संदर्भात शिवाजीगनर येथील कोर्टात दावा दाखल केला आहे. त्यातील प्रतिवादी यांना कोर्टात हजर राहण्यासाठी समन्स बजावण्याचे काम काळे बेलिफ करत होते. ते समन्स वेळेत बजावून त्याचा रिपोर्ट न्यायलयात देण्यासाठी काळे याने तक्रारदाराकडे एक हजार रुपयांची लाच मागितली.



# राज्यात हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
आरक्षणाच्या मागणीसाठी शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन करणाऱ्या मराठा समाजातील आंदोलकांवर जालना जिल्ह्यातील अंतरवली येथे अमानुष पद्धतीने लाठीचार्ज करण्यात आला. मराठा समाजाला आरक्षण देऊ म्हणणाऱ्या भाजप सरकारने मराठा आंदोलकांवर अमानुष लाठीचार्ज करण्याचा आदेश देऊन लोकशाहीची क्रूर थट्टा केली आहे. सदर घटनेचा युवक काँग्रेसकडून तीव्र निषेध करतो. राज्यात हुकूमशाही पद्धतीने राज्यकारभार होत आहे. लाठीचार्ज करताना पोलिसांनी थोडी देखील माणुसकी दाखवली नाही. भाजप सरकारला असलेली ही सत्तेची मस्ती जनता उतरवल्याशिवाय राहणार नाही,असे मत युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रोहन सुरवसे-पाटील यांनी व्यक्त केले. बहुजन समाजातील मोठा भाऊ असलेल्या मराठा समाजाने आपल्या आरक्षणाच्या मागणीसाठी आजपर्यंत ५६ पेक्षा जास्त शांततापूर्ण विराट मोर्चे काढले आहेत. तसेच इतर देखील मोठ्या स्वरूपाचे मोर्चे संविधानिक पद्धतीने आणि अहिंसापूर्ण मार्गाने काढले गेले. कधीही सरकारी मालमत्तेचे नुकसान अद्याप या मोर्चांमधून झालेले नाही. जालन्यातील घटना अत्यंत निषेधार्थ आहे. गृह विभागाच्या आदेशाशिवाय हा अमानुष लाठीचार्ज शक्य नाही. म्हणून राज्याचे अकार्यक्षम गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानेच हा लाठीचार्ज करण्यात आला आहे.